नि ७

# मे. सह दिवाणी न्यायाधीशसो व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, विटा यांचे न्यायालयात

फौजदारी कि. अर्ज नं.८२/२०२६

महाराष्ट्र सरकार तर्फे,
श्री. म.रा.मासाळ,
अन्न सुरक्षा अधिकारी,
अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, सांगली ...... फिर्यादी

विरुध्द

श्री. गणेश उर्फ गजानन अशोक तावरे,
मे. श्री किराणा स्टोअर्स ॲड इलेक्ट्रीकल्स मर्चंट,
चौंडेश्वरी नगर, मुंढे मळा, महात्मा गांधी शाळेजवळ,
मु.पो.विटा, ता.खानापूर, जि. सांगली ...... आरोपी

**महाराष्ट्र सरकार तर्फे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, सांगली सविनय सादर करतात ते पुढीलप्रमाणे**

Seen & filed
OMFC
4-8-2026

१. सदर प्रकरणात, महाराष्ट्र सरकार तर्फे अन्न सुरक्षा व मानदे कायद्याच्या तरतुदीनुसार मला प्रदान असलेल्या कायदेशीर शक्ती अन्वये मी, दि. ०५/०६/२०२६ रोजी सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती एस.व्ही.हिरेमठ, विटा पोलिस स्टेशन येथील पोलिस उपनिरीक्षक श्रीमती जयश्री कांबळे व श्री किरण खाडे, पो.ह.१७५४ आणि पंच साक्षीदार क. श्री. सचिन रामचंद्र तावरे, वय ४५ वर्षे, रा. साळशिंगे रोड, मु.पो.विटा, ता.खानापूर, जि.सांगली यांचेसमवेत मे. श्री किराणा स्टोअर्स ॲड इलेक्ट्रीकल्स मर्चंट, चौंडेश्वरी नगर, मुंढे मळा, महात्मा गांधी शाळेजवळ, मु.पो.विटा, ता.खानापूर, जि. सांगली या पेढीची तपासणी केली त्यावेळी सदर पेढीत श्री. गणेश उर्फ गजानन अशोक तावरे विक्रेता व मालक हजर होते व त्या पेढीमधुन महाराष्ट्र राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त यांनी सार्वजनिक आरोग्याच्या हिताने जारी केलेला प्रतिबंध आदेश क. असुमाअ/अधिसुचना/४११/२०२५ दि. १६ जुलै २०२५ नुसार लोक आरोग्य हितास्तव महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित केलेले गुटखा, पानमसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखु, स्वादिष्ट/सुंगधित सुपारी, अपमिश्रके युक्त उत्पादित चघळण्याची तंबाखु, खर्रा, मावा इ. पदार्थ छुप्या विक्रीकरता साठविलेले आढळुन आले. सदर हजर विक्रेत हे स्वतः प्रतिबंध केलेले वरीलप्रमाणे पदार्थ पेढीत बाळगुन लोकांना विकत होते म्हणुन सदर पेढी सील करुन श्री. गणेश उर्फ गजानन अशोक तावरे यांचेसह प्रकरणाची संपुर्ण चौकशी होण्याकरिता विटा पोलिस ठाणे येथे प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे त्यानुसार विटा पोलिस ठाणे यांनी एफआयआर नं. ०२४७/२०२६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

२. सदर प्रकरणातील प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या पुरवठादाराबाबत विचारणा केली असता, श्री. गणेश उर्फ गजानन अशोक तावरे यांनी त्याचे खरदी बील उपलब्ध नसल्याचे सांगितले तसेच महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित केलेले गुटखा, पानमसाला, स्वादिष्ट / सुगंधित तंबाखु, स्वादिष्ट / सुंगधित सुपारी, अपमिश्रके युक्त उत्पादित चघळण्याची तंबाखु, खर्रा, मावा या स्वरुपात किंवा अन्य कोणतीही नावाने संबोधले जाणरे अन्न पदार्थाचे उत्पादन, साठा, वितरण व विक्री करण्यात बंदी असल्याबाबत पुर्ण कल्पना असल्याचे मान्य केले आहे.

३. सदर प्रकरणातील श्री. गणेश उर्फ गजानन अशोक तावरे यांनी प्रतिबंधित केलेले पदार्थ पेढीतुन विक्रीकरिता कोणी पुरवठा केला, त्याचे खरेदी बिल किंवा अन्य कसलाच तपशील सादर केलेला नाही.

४. सदर पेढी सील करण्यापुर्वी श्री. गणेश उर्फ गजानन अशोक तावरे यांना त्यांच्या पेढीत विक्रीसाठी साठा केलेली नाशवंत उत्पादने, बिस्किट, गोळ्या वैगेरे अन्नपदार्थ पेढीच्या बाहेर घेण्याची सुचना केलेली होती.

५. सदर पेढी ही लोक वर्दळीच्या चौकामध्ये /शाळेजवळ आहे आणि सदर ठिकाणाहुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले पदार्थ या पुढे सुध्दा विक्री होण्याची दाट शक्यता आहे.

**प्रार्थना**

वरीलप्रमाणे मुद्येनिहाय म्हणणे महाराष्ट्र सरकार तर्फे अन्न सुरक्षा अधिकारी हे सादर करीत आहेत. अन्न सुरक्षा अधिकारी, यांची मेहरबान न्यायालयास विनंती आहे की, आरोपी यांचा अर्ज खारीज होवुन जन आरोग्य हितस्तव आरोपी यांची सदर पेढी ही खुली करण्यात येवु नये.

ठिकाण - मे.सह दिवाणी न्यायाधीशसो व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, विटा
दिनांक - ३०/०७/२०२६

महाराष्ट्र सरकार तर्फे,

(म.रा.मासाळ)
अन्न सुरक्षा अधिकारी,
अन्न व औषध प्रशासन, म. राज्य,
सांगली